# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/07/2023 (शनिवार) सकाळ


**नागपूर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात आले कोबिंग ऑपरेशन**
**एकुण ०४ आरोपीतांवर कारवाई**

आज दिनांक ०१/०७/२०२३ रोजी मा. पोलीस अधीक्षक विशाल आनंद व अपर पोलीस अधिक्षक संदिप पखाले यांच्या मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी आशित कांबळे रामटेक विभाग रामटेक अतिरीक्त कार्यभार कन्हान विभाग कन्हान, उपविभागीय पोलीस अधिकारी पुजा गायकवाड मॅडम, परि. पोलीस अधीक्षक अनिल मस्के, परि. पोलीस उप अधीक्षक झालटे, पोलीस निरीक्षक मकेश्वर पोलीस स्टेशन कन्हान, पोलीस निरीक्षक मुळुक, मानकर, ओमप्रकाश कोकाटे स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण, सपोनि. आशिष ठाकुर, पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे, आशिष मोरखडे, सहायक पोलीस निरीक्षक चौव्हान, पोलीस हवालदार मुदस्सर जमाल, हरिश सोनभद्रे, पोलीस शिपाई आकाश सिरसाट, अश्विन गजभिये, निखिल मिश्रा, अनिल यादव तसेच विविध पोलीस स्टेशन व कार्यालयीन २५ अधिकारी व ११० अंमलदार यांच्या सह पोस्टे कन्हान हददीत कोबींग ऑपरेशन राबवण्यात आले असता सदर ऑपरेशन दरम्यान पोलीस स्टेशन हददीत एकुण ४२ आरोपीतांचे राहते घराची झडती घेण्यात आल्या. त्या दरम्यान **आरोपी नामे– १) साहिल अब्दुल खान, रा. खदान नं. ०३ कन्हान** यांच्या ताब्यातुन १ माउझर, १ जिवंत काडतुस **२) परशुराम मखंजु गौतम रा. फुकट नगर कन्हान** यांच्या ताब्यातुन १ देशी कट्टा, १ जिवंत काडतुस व १ लोखंडी तलवार **३) अमन अजित सिंग, रा. खदान नं. ०६ कन्हान** यांच्या ताब्यातुन २ लोखंडी तलवार **४). निखील उर्फ सन्नी अनिल गजभिये रा. अशोक नगर कन्हान** यांच्या ताब्यातुन १ लोखंडी कोयता मिळुन आल्याने सदर ४ आरोपीतांवर भारतीय हत्यार कायदा अन्वये कायदेशिर कारवाई करून गुन्हा नोंद करण्यात आला. असे एकुण ०२ अग्नीशस्त्र, ०३ तलवार ०१ कोयता जप्त करून आरोपीतांवर भारतीय हत्यार कायदा अन्वये कायदेशिर कारवाई करण्यात आली. सदरचे कोबींग ऑपरेशन मा. पोलीस अधीक्षक यांचे आदेशावरून रात्री १२.०० वाजेपासुन ०४ वाजे पर्यंत चालले.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर